14) Quasi Contracts in India : A bird'seye || 67
Rakesh Soni, Rajasthan

15) Taslima Nasrin's French Lover: A Kaleidoscopic View in Patriarchy as a... || 70
Reemani Verma, Central University of Jammu

16) प्रसिध्द ऐतिहासिक शिवकालीन घराणे-पानसंबळ' || 72
प्रा.सौ. कापशीकर धनश्री रामचंद्र , जि. सोलापूर

17) भारत आणि पाकिस्तान यांच्यातील काश्मीर प्रश्नात अमेरिकेची मध्यस्थीची भूमिका || 74
प्रा. दिनेश ददाराम माळी & श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील, जि. धुळे

18) परिवर्तनवादी प्रबोधनकारांचा परिचय :- ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले || 77
प्रा.डॉ. गायकवाड यशवंत जंगलू, जि. उस्मानाबाद

19) भारत आणि आदिवासी आंदोलने – एक ऐतिहासिक आढावा || 81
प्रा. डॉ. गौतम शंभरकर, चंद्रपूर

20)खान्देशातील बैलगाडीचा व्यवसाय || 88
प्रा.डॉ. भामरे धाधाजी दगा, जि.धंदुरबार

21) धर्माचे बदलते स्वरुप : संक्षिप्त सामाजिक विश्लेषण || 91
प्रा.डॉ.बी.एन.कावळे, जि.औरंगाबाद

22) बौद्ध धर्मातील संघ प्रणाली || 93
प्रा.विष्णू ज. पवार, जि.वर्धा (महाराष्ट्र)

23) कादंबरीचे वाङ्मयीन आकलन || 96
डॉ.राजेंद्र वडमारे, जि.अहमदनगर

24) निश्चलनीकरनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम || 109
श्री. विनायक मारोती वागतकर, रायगड

25) पंडिती साहित्याची वैशिष्टये || 113
प्रा.डॉ. शिवप्रसाद पंजाबराव वायाळ, ता.जि. वाशीम

26) निर्मल वर्मा के यात्रा संस्मरण ''चीड़ों पर चाँदनी'' की समीक्षा || 116
जय सिंह यादव, गोरखपुर

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



S.P.Mahavidyalaya Bhoom Ta.Bhoom Dist.O.bad

18

# परिवर्तनवादी प्रबोधनकारांचा परिचय :- ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले

प्रा.डॉ. गायकवाड यशवंत जंगलू
शंकरराव पाटील महाविद्यालय भूम, ता. भूम, जि. उस्मानाबाद

**********

प्रास्तविक :-

भारतातील समस्त महिलांना त्यांच्या पायावर उभे करुन त्यांना धावायला शिकविणाज्या एवढेच नव्हे तर पुरुषांच्याही पुढे जायला लावणाज्या भारताच्या "मदर इंडिया" १९ व्या शतकातील थोर समाजसुधारक आणि श्रमिक, पीडित वर्गाच्या दास्याची परखड मीमांसा करणारे क्रांतीकारक राष्ट्रपिता तसेच भातीय समाज सुधारणेत व स्वातंत्र्य चळवळीत ज्यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. तसे ज्योतीराव फुलंच्या पत्नी सावित्रीबाई फुले, ज्या काळात स्त्रिला समाजात मानाचे स्थान मिळत नव्हते, शिक्षणापासून आणि स्वातंत्र्या पासून दुर ठेवून स्त्रीला परावलंबी आणि पारतंत्र ठेवले जाते होते, त्या काळात म्हणजे ०३ जानेवारी १८३१ रोजी सावित्रीबाईचा जन्म सातारा जिल्ह्यातील शिरवळपासून जवळच असलेल्या नायगावच्या खंडोजी नेवसे पाटील आणि लक्ष्मीबाई या दाम्पत्याच्या घरी झाला.

स्त्री स्वातंत्र्य औषधालाही नसलेल्या समाजात आणि पारतंत्र्याच्या काळात जन्म झालेल्या सावित्री माईनां बंधनाचा आर्थ समजत नव्हता. अशा लहानशा वयातच न कळतच त्यांच्या कार्याला सुरुवात झाली. अगदी छोट्या असताना एका दुबळ्या मुलाचे फुल हिसकावून घेणाज्या धटिंगनाला अद्दल घडविली, तर पक्षांची अंडी खानाज्या नागाला ठेचून ठेचून मारण्याचे धाडस करणा-या सावित्रीबाई फुले हे अत्यंत धाडशी आणि क्रांतीकारी व्यक्तीमत्व आहे.

कांही मानसं निसर्ग क्रमात मरतात तर काही मारली जातात. मेल्यानंतर त्यांचं काय होत हे माहिती नाही परंतू असे मानतात की, पुण्यवान मानसे स्वर्गात जातात आणि पापी मानसे नरकात जातात असे आपण मानत असतो. खरे म्हणजे पृथ्वी तलावर जगत असताना भोवताली निट नजर टाकली तरी स्वर्ग आणि नरक याचं चांगल दर्शन आपल्याला होते. जी व्यक्ती पृथ्वीवर अस काही जगते की, तीच्यामुळे भोवतालच्या जगात न्याय, आनंद, प्रसंगता निर्माण होते. तिच्या मरणा नंतर पिढ्यानपिढ्य तिची आठवण लोक आपल्या ह्दयात साठवून ठेवतात. अशा थोर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यबद्दल आपल्या जाणून घ्यायचे आहे.

प्रा.हरी नरके म्हणतात, "ज्योतीबा पेक्षा त्यांच्या पत्नीचे कौतूक करावे तेवढे थोडेच होईल. तीची योग्यता काय सांगावी? आपल्या पती बरोबर तीने संपूर्ण सहकार्य केले व त्यांच्या बरोबर राहून वाट्यास येतील त्या हालअपेष्ठा भोगल्या. उच्चवर्णीयातील उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रीयातही अशा प्रकारची त्यागी स्त्री आढळून येणे कठीण आहे. त्या उभयतांनी लोककार्यार्थ आपले सारे जीवन खर्च केले."[1]

जो पर्यंत सुर्य, चंद्र असतील तो पर्यंत भारत भूमीच्या कुशीतील प्रत्येक जन सावित्रीबाईना कदापिही विसरणार नाहीत. कारण या महान महिलेचा जन्म महाराष्ट्रात होऊन सुध्दा अखिल राष्ट्राच्या उभारणीसाठी त्यांनी आपले जीवन या भारत भूमीसाठी चंदनासारखे झिजवीले आहे. आज पर्यंत अनेक वैद्यकीय पंडीतांनी धर्म, मार्तंडानी पंचाग पाहून अनेक माता भगिनीच्या जन्म पत्रीका लिहिल्या परंतु जेव्हा सावित्रीबाईंचा जन्म झाला त्या या देशातील पहिल्या स्त्री शिक्षीका बनून आणि अद्यसमाज क्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले यांनी मुलींची पहिली शाळा काढली तेव्हा पासून या देशातील माता भगिनीच्या जीवनात शिक्षण योग निर्माण झाला. त्यांच्या जन्मपत्रीकेत शिक्षण योग आला म्हणून मोठ्या अभिमानाने आपल्याला नमुद करता येते की, विद्येची देवता कोण असले ? तर क्रांतीजोती सावित्रीबाई फुले याच आहेत.

"खंडोजी नेवसे पाटील यांनी "सावित्री" हे नाव ठेवण्यामागे एक व्यापक भुमिका होती. भारतीय समाजात सत्यवानाच्या सावित्रीची कथा सर्वाना माहिती आहे. पुरानातल्या या सावित्रीने आपल्या पतीचे प्रणा यमाच्या तावडीतून सोडवून आणल्याचे आपण ऐकतो परंतू या आधुनिक सावित्रीने हजारो वर्षापासून मनु रुपी यमाच्या पश्यात आडकलेल्या लाखो-कराडो भारतीय स्त्रीयांना अज्ञान, रुढी परंपरा, पुरुष प्रधान संस्कृतीच्या गुलाम गिरीतून मुक्त केल्याचे आपण अभ्यासले आहे, अनुभवलेले आहे. पुराणातल्या कल्पीत सावित्रीने हजारो वर्षापासून कौतूक केले जाते. या सावित्रीने फक्त आपल्या पतीचेच प्राण वाचवल्याचे आपण ऐकतो. परंतू या आधुनिक सावित्रीने धर्माच्या अंध रुढीच्या पाश्यात अडकलेल्या सर्व धर्मातील स्त्रीयांना शिक्षण देऊन कायमचे



S.P.Mahavidyalaya Bhoom • Bhoom • Tq.Bhoom Dist.O.bad

मुक्त केले. त्यामुळे या आधुनिक सावित्रीचा सन्मान झाला पाहीजे. तीच्या विचाराची रोज घराघरात पुजा केली पाहिजे परंतू असे होताना दिसत नाही. याची खंत वाटते"[२]

भारतीय संस्कृतीच्या इतिहासातील एका नव्या युगाचा प्रारंभ सुरु होतो. तो सावित्रीबाईच्या जन्मापासून शतकानुशतके असलेली मुनवादी व्यवस्था बदलण्याचा त्यांचा प्रयत्न अचंबीत करणारा आहे. जीवघेण्या रुढी परंपरामुळे स्त्रीच्या आयुष्याची आवस्था दयनीय बालपणी विवाह झाल्यानंतर जगण्याच्या सर्व कुलपकिल्ल्या सासरच्या हतात देऊन अनेक स्त्रीयांचे आयुष्यच संपविण्यात येत असे. सतीच्या नावा खाली स्त्रीला जाळणारा व ते सुध्दा अगदी जीवंत आणि त्यांलाचा धर्म म्हणून गोंजारनारा भारत हा पहिला देश होता. स्त्री जातीला मन व भावना असतात, ही मानवतेची बाराखडी येथील सडलेल्या व्यवस्थेने पुसून टाकली होती. अशा अंधार युगात भारत मातेच्या इतिहासात तेजस्वी नारी रत्नांचा जन्म झाला व स्त्रीयांच्या आयुष्यात उजेड पर्व सुरु झाले.

सावित्रीमाईचे कार्य म्हणजे स्त्रीयांच्या विकासाचे उर्जाकेंद्र असून समतेच्या व समानतेच्या समाजाचे संकल्प चित्रच होय. पुरुष सता जाताना पाहिला का? या एका क्रांतीतून किती तरी स्त्रियांना जीवदान मिळाले. किती बिनबोभाटपणे जोतीबानी सावित्रीबाईचे निपुत्रीकता स्विकारली होती. वैयक्तीक आयुष्यातील ही समानता जगापुढे केवढा आदर्श ठेवते व पुढचे पाऊल टाकण्याचा महासंदेश देते. दुसज्या लग्नाचा आग्रह केल्यानंतरचे राष्ट्रपिता जोतिराव फुलेंनी दिलेले उत्तर तर पुरुषी सत्तेला मारलेली सणसणीत चपराकच आहे. सावित्रीबाईच्या या देशातील स्त्री जातीने लिहिलेले व स्त्री शिक्षण युगाचा आरंभच केवढी समानता व ती सुध्दा एवढ्या विखारी समाज व्यवस्थेत, जोतिराव पुरुष असून सुध्दा स्त्रियांचे दु:ख, वेदना त्यांना चांगले कळले होते. जे २१व्या शतकात आज ही पुरुष सत्तेला कळले नाहीत. हातात हात धरुन सावित्रीबाईना स्त्रियांचे दु:ख जोतिरावानी दाखविले व समाज कार्याचा एक कोरीव संस्कार त्यांच्यावर केला या देशातील स्त्रीया विषयीचे एक सुंदर स्वप्न दोघांनी रंगविले आहे.

**स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या अग्रणी:-**

भारतीय स्त्री ही अनेक जाचक रुढी प्रथा परंपरामध्ये अडकलेली होती. यामुळे भारतीय स्त्रिला हजारो वर्षापासून शिक्षणाचा अधिकार नकारलेला होतो ही स्त्री गुलामगिरीत जगत होती. तीला कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. त्याला आधार होता तो येथील धर्म ग्रंथाचा आणि नंतरच्या काळात या जाचक रुढी प्रथा परंपराना छेद देऊन आणि धर्म शास्त्राच्या अभेद्य वाटणा-या भिंती फोडून येथील स्त्रिला ज्ञानाचा प्रकाश देण्याचे एतिहासिक कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले.

मनुस्मृतीमध्ये स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू असून तिला चूल आणि मुल आणि पुरुषांची सेवा, सुश्रुषा करणे घराच्या बाहेर न निघता पुरुषांच्या मर्जीनुसार कार्य करणे एवढेच तीचे कार्य आहे. असे रेखाटले आहे. अशा स्त्रीयासाठी सर्व दरवाजे बंद असणाऱ्या काळात क्रांतीजोती सावित्रीबाईचा जन्म झाला. येथील शोषीत, पिडीतांच्या जगण्याचा नेमकेपणाने वेध घेऊन वेळ प्रसंगी येथील समाज व्यवस्थेवर कठोर प्रहार करुन येथील शोषीत वर्गासाठी हजारो वर्षापासून बंद असलेली शिक्षणाची दारे राष्ट्रपीता फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने उघडली धर्मशास्त्राच्या बंधनात अडकलेल्या स्त्री-पुरुषांना नवा ज्ञानमार्ग खुला करुन दिला.

सावित्रीबाईना हे ज्ञानदानाचे कार्य करीत असताना अनंत अडचणीना सामोरे जावे लागले कारणा त्या काळात स्त्रीला समाजात मानाचे स्थान नव्हते. शिक्षणापासुन दूर स्त्रीला परावलंबी आणि परतंत्र ठेवले जात होते. स्त्रियांना सर्वच दारे बंद होते याच काळात गोविंदरावांनी क्रातीबा जोतीबारावांना आणि सावित्रीबाईना घर सोडण्यास सांगितले. कठोर परिश्रम समाजाचा प्रखर विरोध, १८ विश्वे दारिद्रय ही सर्व दु:खे सहन करती या दाम्पत्याच्या प्रवासाला सुरुवात झाली. सावित्रीबाई फुले या एक उत्तम शिक्षिका, आदर्श मुख्याध्यापिका चंदनासम झिजणाऱ्या समाज सेविका, लेखीका, कवियत्रीतर आहेच, त्याच बरोबर त्या एक उत्तम वक्ताही होत्या. विविध विषयावर १८९२ साली प्रसिध्द पाच भाषणामुळे त्या एक उत्तम वक्त्या असल्याचे लक्षात येते.

सावित्रीबाईच्या मातृहदयी, समता-ममतामयी कर्तृत्वाचा खरा आलेख त्यांच्या बालहत्या प्रतिबंधक गृहाच्या वात्तल्यमयी कार्यातून दिसून येतो. बालहत्या प्रतिबंधगृह सुरु करण्यापूर्वी फुले दांपत्याचे स्नेही असलेले सदाशिवराव गोवंडे यांच्याकडे एक हृदय हेलावून टाकणारी घटना घडली सदाशिवराव गोवंडे यांच्याकडे काशीबाई नावाची एक विधवा होती. कुणा एका शास्त्रीबुवांनी गोड बोलून तिला फसविले होते आणि यातूनच काशीबाईस दिवस गेले. पुढे ती बाळंतीण झाली, परंतू समाज आपल्याला जगू देणार नाही या भीतीपोटी तिने "भ्रुणहत्या" केली. त्यानंतर तिने हे बाळ गोवंड्याच्या परसातील विहिरीत फेकुन दिले. नंतर काही वेळाने हे शव फुगुन वर आले पोलीसांनी काशीबाईवर खटला भरला तीला जन्म ठेपेची, काळ्या पाण्याची शिक्षा झाली एका विधवा स्त्रीला एवढी गंभिर शिक्षा झालेली पाहून सावित्रीबाईचे मन हेलावून गेले. त्याच प्रसंगी म्हणजेच इ.स. १८६३ साली बालहत्याप्रतिबंधक



S.P. Mahavidyalaya, Bhoom Tq.Bhoom Dist.O.bad Bhoom

गृह स्थापन केले. कुठलेही सरकारी अनुदान नसलेले हे गृह तत्कालीन काळात अनेकासाठी प्रेरणास्थान ठरले त्यानंतर इ.स. १८७४ साली आणखी एका घटणेत काशीबाई या ब्राम्हण विधवेच्या अनौरस पुत्राचे फुले दाम्पत्याने दत्तक घेऊन त्याला वैद्यकिय शिक्षण देऊन डॉक्टर बनविले. दत्तक यशवंतला पुत्रप्रेम देऊन आपल्या मालमत्तेचा उत्तराधिकारी बनविले. अस्पृश्यांना सार्वजनिक विहिरीवर पाणी भरु देणे याबाबत विरोध होत असे या वेळी जोतिरावांनी १८६८ मध्ये स्वता:च्या राहत्या घरातील हौद अस्पृश्यांना पाणी भरण्यासाठी खुला करुन दिला. अशा या युग स्त्रीने पुण्यातील सनातन्यांच्या गुहेत समाज सेवेचा स्त्री शिक्षणाचा हा दिवा प्रज्वलीत केला आणि स्त्री शिक्षणाला नवा अर्थ प्राप्त करुन दिला.

**स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या :-**

ज्या काळात स्त्रीचे चूल आणि मुल ऐवढेच विश्व होते त्या काळात जात, धर्म लिंगावर आधारी समाज व्यवस्थेला न जुमानता सावित्रीबाईनी स्त्रीमुक्तींचा व स्त्री शिक्षणाचा पाया रचला. ज्या काळात शुद्र आाी अतिशुद्र व स्त्रियांना विद्या शिकणे हे पाप समजले जाई त्या काळात अनेकांचा विरोध झुगारुन क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणांची मुहर्तमेढ रोवली.

जोतिराव व सावित्रीबाई या उभयतांनी शिक्षण संस्था काढून इतरांना शिक्षणाचे दरवाजे उघडे करुन दिले. "नेटीव्ह फिमेल स्कुल पुणे" व दि सोसायटी प्रेयरी फॉर प्रमोटिंग, दि एज्युकेशनल ऑफ महारस, मांगस अँण्ड एस्ट्रेटीज" या दोन शिक्षण संस्था त्यांनी स्थापन केल्या पाहिली शाळा १५ मे १९४८ रोजी सुरु केली. त्यानंतर इ.स. १८५१ व १८५२ साली मुलांच्या तीन शाळा अनुक्रमे पहिली शाळा "आण्णासाहेब चिपळूनकर वाडा" दुसरी शाळा "रास्ता पेठेत" व तीसरी शाळा "वेताळ पेठेत काढल्या" त्या काळात मुलींच्या शाळेत आणि महार, मांगाच्या शाळेत शिक्षक मिळणे फार कठीन होते नव्हेतर कोणीही तयार होत नसे. अशा परिस्थितीत सावित्रीबाई पुढे आल्या व त्या शाळेत शिकवू लागल्या.

विशेष म्हणजे त्या शिकत असतांना- शिकवतही होत्या. त्यांना त्या काळी केशव शिवराम भदाळकर, सखाराम यशवंत परांजपे तसेच नगरची फेरारबाई व पुण्याच्या मिचलबाई यांनी सावित्रीबाईच्या शिक्षणांची विशेष जबाबदारी घेतली. सुरुवातीला त्यांच्या शाळेत अन्नपुर्णा जोशी, सुमती मोकाशी, दुर्गा देशमुख, माधवी थत्ते, सोनु पवार व जानी करडिले अशा सहा मुली होत्या पुढे हळु हळु मुलींची संख्या वाढू लागली. पुढे या तीन शाळेत अनुक्रमे पहिल्या शाळेत ४८ मुली, दुसऱ्या शाळेत ५१ मुली, तिसऱ्या शाळेत ३३ मुली होत्या. पहिल्या शाळेत म्हणजेच आण्णासाहेब चिपळूनकर वाडा या शाळेत स्वत: सावित्रीबाई मुख्याध्यापक होत्या इतर दोन शाळेत मोरेश्वर व विठ्ठल भास्कर हे सहाय्यक मुख्याध्यापक होते.

त्या काळी शुद्रतीशुद्रांच्या मुला-मुलींनी शिकू नये यासाठी प्रतिगाम्यांनी नाना प्रकार केले. शिक्षण घेणे हे केवळ उच्च वर्णीयांचे काम आहे शुद्रांचे नाही. शिकणा-या मुलींचे नवरे मरतात विधवा होतील, नवऱ्याच्या आज्ञेत राहणार नाहीत. मुली शिकल्यावर भ्रष्टचार होईल अशा प्रकारचे पुळचट विचार समाजात पसरवून प्रतिगाम्यांनी शिक्षणाला विरोध करायला सुरुवात केली. विद्याही शुद्र आणि अतीशुद्रांच्या घरी चाललीतर मोठा अनर्थ होईल सर्वनाश होईल. असा भयंकर प्रचार प्रचार व प्रसार सनातनी व प्रतिगाम्यांनी सुरु केला. सनातनी लोकांचा हा कुटील डाव आहे हे सावित्रीबाईनी मनोमन ओळखले होते. म्हणूच त्या डगमगल्या नाहीत आणि शिक्षणाने समाजात परिवर्तन होणाराच असा पक्का विश्वास त्या उभयतामध्ये होता. हजारो वर्ष चालत असलेल्या रुढी ह्या महाभंकर सनातनाच्या बाजूने होत्या परंतू सावित्रीबाईनी आपली जिद्द सोडली नाही. त्यांच्यावर आनेक वाईट प्रसंग आले. एकदा तर एकाने दगड मारुन सावित्रीबाईचे डोके फोडले परंतू त्या डगमगल्या नाहीत. तर स्त्रि शिक्षाचे कार्य अशाही परिस्थितीत अविरतपणे चालूच ठेवले. एकादा एक व्यक्ती सर त्यांच्या आंगावर धावून आला. सावित्रीबाईनी मात्र न घाबरता सर्व तागद येवटून त्यांच्या थोबाडीत मारली. तो थोबाडावरील आवाज म्हणजे मुक्ती युगाचा आरंभच होता. समता आणि स्वातंत्र्याचा तो आवाज होता. तो आवाज हा अंधारात चाचपडणा-यांचा, दीन-दुबळ्यांचा होता. आपण प्रतिकार करीत नाहीत म्हणून इतर शिरजोर होतात. त्यांची प्रवृती अधिक बळावत असते.

सावित्रीबाई फुले या एक उत्तम शिक्षक, आदर्श मुख्याध्यापिका, चंदनासम झिजणा-या समाजसेविका, लेखीका तसेच त्या कवियत्री ही होत्याच. राष्ट्रपिता फुले यांनी इ.स. १८४८ पासून ते १८५२ पुणे व सातारा व आजू बाजूच्या परिसरात एकुण १८ शाळांची सुरुवात केली. या शाळा चांगल्या चालाव्यात म्हणून राष्ट्रपीता फुले यांनी एक मंडळ स्थापन केले होते. जोतिरावांच्या या शिक्षण प्रसार आणि प्रचारांच्या कार्यात सावित्रीबाईनी मोलाची साथ दिली.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी फुले दांपत्याने पुणे येथे बोर्डीग काढून तेथील विद्यार्थ्यांची काळजी सावित्रीबाई स्वत: घेत असत. शोषणाची हत्यारे कोणती आहेत. याचे आकलन शिक्षणातून होते. शिक्षण हे प्रत्येकाला मिळाले पाहिजे. अशी त्यांची आग्रही भूमिका



S.P. Mahavidyalaya Bhoom, Bhoom, Tq.Bhoom Dist.O.bad

१५० वर्षापुर्वी मांडली होती.

सावित्रीबाईच्या शिक्षणामुळे तान्हूबाई बिरजे ही मराठा मुलगी पहिली महिला संपादक झाली. तर ताराबाई शिंदे ही पहिली स्त्रीवादी लेखीका निर्माण झाली महाराष्ट्रात स्त्रि शिक्षाणाची चळवळ सामर्थ्यवान बनली. आजही ग्रामीण भागात मुलींना जास्त शिकण्याची संधी मिळत नाही तर काही मुली शेतात कष्ठ करुन शिक्षण घेतात. अशा मुलींनी त्यांच्या पालकांनी सावित्रीबाईचा आदर्श डोळ्या समोर ठेवून प्रोत्साहन दिले पाहिजे.

शिक्षण व्यक्तीला नजर देते, बुध्दीला प्रश्न विचारण्याचे अधिकार देते. अन्यायाविरुध्द पेटून उठण्याचे धाडस होते. शिक्षण म्हणजे सुर्याचे किरण! हे किरण ज्याच्यावर पडले त्यांचे जीवन तेजोमय झाले. सावित्रीबाई फक्त शिक्षित होत्या तरीही त्यांनी सर्व स्त्रियासाठी शिक्षणाची दारे खुली व्हावीत. स्त्रियांची गुलामगिरी संपावी म्हणून प्रचंड हाल, परिश्रम, अपमान, दगडगोटे, शिवीगाळ सारे सहन केले.

सावित्रीबाईने केलेल्या अनमोल, अगाध आणि अतिप्रचंड कार्यकर्तृत्वामुळे पुढे सावित्रीबाई या सावित्रीमाई बनल्या जेव्हा मानसे पशु सारखी वागत होती त्यावेळी हे दाम्पत्य ज्यांना पशुपेक्षा हीन वागणूक दिली जात होती. त्या शुद्रातिशुद्राना माणसे बनविण्याचे कार्य करत होते. अवघ्या ६६ वर्षाच्या जीवनात ऐवढे महान कार्य केले की, त्यांना "मदर इंडिया" असेच म्हटले पाहिजे.

मानवी जीवनात सर्व अनर्थाचे मूल अविद्या आहे. हे महात्मा फुलेनां कळाले. तेव्हा त्यांनी प्रथम आपल्या पत्नी सावित्रीबाईना शिकविले व त्या भारतातील पहिल्या शिक्षीका बनविल्या ०१ जानेवारी १८४८ रोजी पुण्याला भिडेवाड्यात शाळा काढली ती सुध्दा भारतातील पहिली शाळा ठरली. आधुनिक काव्याचे जनक ज्यांना म्हटले जाते ते "केशवसुत" यांच्या ३० वर्ष आगोदर सावित्रीबाईंचा एक "काव्यफुले" हा कवितासंगृह प्रकाशित झाला. त्यामुळे आधुनिक काव्याचे जनक या सावित्रीबाई फुले ठरतात.

अविद्येने अपरिमित नुकसान होते, हे भारतात प्रथम फुले दाम्पत्यानेच सांगितले. तसेच बहुजनांना स्त्रियांना शिक्षणांची दारे खुली केली दि. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुलेचे निर्वाण झाले. तेव्हा दत्तक पुत्र यशवंत यांना टिटवे धरण्यास व अग्नि संस्कार करण्यास जात पंचायतीने विरोध केला अशा प्रसंगी धिरोदत्त सावित्रीबाईनी रणरागिणीचे रुप धारण केले. त्या पुढे गेल्या आणि त्यांनी टिटवे स्वत:च्या हातात धरले व अंत्ययात्रेत शवापुढे चालू लागल्या चितेला अग्निही त्यांनीच दिला. भारत देशात हे प्रथमच घडले.

शेवटी इ.स. १८९६ मध्ये पुण्यात प्लेगच्या साथीचे थैमान घातले. प्लेग रोग हा संसर्गजन्य रोग आहे हे माहिती असून देखील सावित्रीबाईनी प्लेगच्या रुग्णांची सेवा करु लागल्या. पांडूरंग गायकवाड या प्लेग झालेल्या दलितांच्या मुलाला सावित्रीबाईनी स्वत:च्या पाठीवरुन हॉस्पिटलमध्ये नेऊन दाखल केले. त्यात त्यांनाही प्लेगची लागण झाली. यामध्येच या महामातेचे १० मार्च १८९७ ला निर्वाण झाले. युगायुगातून एकदाच अशी महामाता जन्माला येते आणि "मदर इंडिया" होते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले- प्रा. हरी नटके- नाग नालंदा प्रकाशन (व्दितीय आवृत्ती -२००७) पृष्ठ नं. ८

२. सावित्रीबाई फुले यांची संग्रग कविता, संपादक डॉ. शोभा हनवते- चिन्मय प्रकाशन औरंगाबाद पृष्ठ नं. ७

३. दै.सम्राट दि. ०४ जानेवारी २०१९ विचारपटि पान ४

४. दै. सम्राट दि. ०३ जानेवारी २०१९ (गुरुवार) पान ५

५. तेजस्विनी, प्रा. गौतम निकम- विमल किर्ती प्रकाशन, चाळीसगाव

६. मी सावित्री! यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रकाशन नागपूर.

❑❑❑



S.P. Mahavidyalaya, Bhoom BHOOM Tq.Bhoom Dist O.bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya, Bhoom
Dist.Osmanabad